


डॉ. बाबासाहेब आंबेडकर

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


हिंदुस्थानच्या अद्वितीय संविधानाचे शिल्पकार,
करोडो दलितांचे मुक्तिदाते
'भारतरत्न' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना
१३५व्या जयंतीनिमित्ताने
दैनिक 'दै. आरंभ पर्व' परिवारातर्फे विनम्र अभिवादन !
- निवासी संपादक


• वर्ष : ०३ • अंक : २०४ • पुणे • मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313


# पुण्यात काँग्रेसचे २ शहराध्यक्ष?

## प्रत्येकी चार मतदार संघांची जबाबदारी देऊन मध्यममार्ग काढण्याबाबत चर्चा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

काँग्रेसने 'संघटन सृजन' अभियान सुरू केले असून, त्याअंतर्गत पक्षांतर्गत बदलाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. पुण्यात काँग्रेसचे शहराध्यक्षपद हा कळीचा मुद्दा असून, गटबाजी रोखण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेना (ठाकरे) पक्षांप्रमाणे आता काँग्रेसही पुण्यासाठी दोन शहराध्यक्ष नेमण्याचा तोडगा काढण्याची शक्यता आहे. शहरातील आठ विधानसभा मतदार संघांपैकी प्रत्येकाकडे प्रत्येकी चार मतदार संघांची जबाबदारी देऊन मध्यममार्ग काढण्याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

काँग्रेस पक्षात 'संघटन सृजन' मोहिमेतून मोठ्या प्रमाणात बदल करण्यात येणार आहेत. त्यानुसार राज्यात साडेसात हजार नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यामध्ये बहुतांश नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात येणार आहे. त्यानुसार पुण्यात दोन शहराध्यक्ष नेमण्याबाबत चर्चा सुरू झाल्याचे काँग्रेसच्या ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने दोन शहराध्यक्ष नेमले आहेत. माजी आमदार सुनील टिंगरे आणि माजी नगरसेवक सुभाष जगताप हे दोन शहराध्यक्ष आहेत. शिवसेना (ठाकरे)) पक्षाचेही संजय मोरे आणि गजानन थरकुडे हे दोन शहराध्यक्ष आहेत. त्याच धर्तीवर काँग्रेसमध्येही दोन शहराध्यक्ष नेमण्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत.

राजस्थानमधील उदयपूर येथे काँग्रेसचे शिबिर झाले होते. त्या शिबिरानंतर राज्यातील काँग्रसने एक आणि दोन जून २०२२ रोजी 'नवसंकल्प शिबिर' शिर्डी येथे घेतले. त्यामध्ये 'एक व्यक्ती एक पद' असा ठराव झाला होता. तसेच पाच वर्षांहून अधिक कालावधीसाठी पदावर असलेल्या पदाधिकाऱ्यांनी पदे रिक्त करावीत, असा ठरावही काँग्रेसच्या बैठकीत करण्यात आला. त्यानुसार माजी आमदार रमेश बागवे यांनी शहराध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर काँग्रेसची संघटनात्मक निवडणूक प्रक्रिया झाली नव्हती. त्यामुळे प्रभारी अध्यक्ष म्हणून अरविंद शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली. तेव्हापासून कोणत्या ना कोणत्या कारणावरून पुण्यातील काँग्रेसमध्ये वाद होत राहिले आहेत. प्रभारी म्हणून काम करणारे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी ब्लॉक अध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यावरून हा वाद निर्माण झाला. पूर्णवेळ अध्यक्षांना ब्लॉक अध्यक्ष नियुक्तीचे अधिकार आहेत, प्रभारी अध्यक्षांना नाहीत, असा आरोप काँग्रेसच्या काही पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला. त्यानंतर शहर काँग्रेसमध्ये गटबाजी झाली. वेळोवेळी ही गटबाजी उफाळून आली.

### प्रदेशाध्यक्ष काय म्हणाले?

**काँग्रेसने 'संघटन सृजन' अभियान सुरू आहे. त्याअंतर्गत काँग्रेसचे राज्य पातळीवरील नेते हे पुण्यात येऊन बैठका घेत आहेत. तसेच निरीक्षकांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. या अभियानाच्या पहिल्याच बैठकीला पक्षाचे प्रमुख पदाधिकारी हे अनुपस्थित होते. त्यावरून मानापमान नाट्य घडले. या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पुण्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. तेव्हा त्यांच्याकडे पुण्यात दोन शहराध्यक्ष नेमण्याबाबत विचारणा करण्यात आली, तेव्हा 'ही संघटनात्मक बाब आहे.' असे सांगत त्यांनी अधिक बोलणे टाळले. मात्र, दोन शहराध्यक्ष नेमण्याबाबतची चर्चा त्यांनी फेटाळली नाही.**

# सिंहगड संवर्धनात ऐतिहासिक तोफगोळ्याचा शोध

## कल्याण दरवाजाच्या बुरुजात दडलेली रणसंग्रामाची नवी साक्ष

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

सिंहगडावर सुरू असलेल्या गडसंवर्धनाच्या कामात पुन्हा एकदा इतिहासाच्या पाऊलखुणा आढळल्या आहेत. कल्याण दरवाज्याजवळील ढासळलेल्या बुरुजात साधारणतः ४-५ इंच व्यासाचा प्राचीन तोफगोळा आढळून आला असून, हा अत्यंत महत्त्वाचा ऐतिहासिक ठेवा मानला जातोय.

नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या सिंहगडावर भूतकाळात अनेक लढाया झाल्या. त्याचे पुरावे, म्हणून या आधीही गडाच्या तटबंदीचे बांधकाम करताना जुने तोफगोळे, तोफा आणि अन्य युद्धसामग्री सापडल्याची नोंद आहे. नव्याने सापडलेला हा तोफगोळा या इतिहासाला अधिक अधोरेखित करणारा शिवकालीन रणसंग्रामाची साक्ष आहे.

सध्या राज्य पुरातत्व खात्याच्या वतीने कल्याण दरवाज्याचे संवर्धन ऐतिहासिक शैलीत वेगाने सुरू आहे. तटबंदीचे पारंपरिक बांधकाम, दगडी रचना आणि मूळ आराखड्याचा अभ्यास करताना इतिहासकालीन रणसंग्रामाच्या अनेक खुणासमोर येऊ लागल्या आहेत. जुन्या तटबंदीमध्ये अडकलेले शस्त्रसामग्रीचे अवशेष हे गडावर ताबा मिळविण्याच्या संघर्षातून झालेल्या लढायांचे जिवंत पुरावेच ठरत आहेत. या तोफगोळ्याचा शोध हा फक्त पुरातन अवशेष सापडण्यापुरता मर्यादित नसून सिंहगडाच्या लढायांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचा आहे. गड संवर्धनामुळे अशा ऐतिहासिक खुणासमोर येत असल्याने शिवकालीन, तसेच ब्रिटिशकालीन युद्धकलेचा पुरावे उजेडात येत आहे. सिंहगडाचा इतिहास अधिक समृद्ध, अभ्यासनीय आणि ठोस पुराव्यांसह जगासमोर उभा राहण्यास हे मोठे पाऊल ठरणार आहे. शिवकालीन युद्धतंत्र, तोफखाना आणि रणकौशल्य समजून घेण्यासाठी असे पुरावे अत्यंत महत्त्वाचे ठरतात.



**कल्याण दरवाजाच्या बुरुजात घट्ट रुतलेला हा तोफगोळा काळजीपूर्वक बाहेर काढून त्याचा आकार, धातू, वजन, तोफेची दिशा आदी बाबींचे विश्लेषण करून त्याची माहिती लवकरच प्रसिद्ध करू.**
**- डॉ. विलास वाहणे, सहायक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग**

# पुणे शहराचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद

- **शुक्रवारी कमी दाबाने येणार पाणी**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**


महापालिकेच्या पर्वती जलकेंद्र अखत्यारीतील पर्वती, वडगाव, लष्कर, एसएनडीटी, वारजे आणि होळकर पंपिंग येथे विद्युत विषयक देखभाल व दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. त्यामुळे संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा गुरुवारी (दि. १६) बंद राहणार आहे. शुक्रवारी सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांनी ही माहिती दिली. पाणीपुरवठा बंद असणाऱ्या भागांमध्ये पर्वती जल केंद्राच्या अखत्यारीतील शहरातील सर्व पेठा, दत्तवाडी परिसर, राजेंद्रनगर, लोकमान्यनगर, डेक्कन परिसर, शिवाजीनगर, स्वारगेट, पर्वती दर्शन, मुकुंदनगर, पर्वतीगाव, सहकारनगर, सातारा रोड, पद्मावती, बिबवेवाडी, तळजाई, कात्रज, धनकवडी, इंदिरानगर, कर्वे रोड ते एसएनडीटी, एरंडवणा, संपूर्ण कोथरूड, डडाणूकर कॉलनी, कर्वेनगर, लॉ कॉलेज रोड, सेमिनरी झोन, मिठानगर, शिवनेरीनगर, भाग्योदयनगर, ज्ञानेश्वरनगर, साईबाबानगर, सर्व्हे नंबर ४२ व ४६ कोंढवा खुर्द, पर्वती टँकर भरणा केंद्र, पद्मावती टँकर भरणा केंद्र, तर वडगाव जलकेंद्र परिसरातील हिंगणे, आनंदनगर, वडगाव, धायरी, आंबेगाव पठार, दत्तनगर, धनकवडी, कात्रज, भारती विद्यापीठ, कोंढवा बुद्रूक या परिसराचा पाणीपुरवठा बंद असणार आहे.

# २ कोटींचे व्यवहार, बनावट खाती की राजकीय संरक्षण?

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात तपासाची गती वाढली असतानाच आता या प्रकरणाने नवे वळण घेतले आहे. शिर्डी पोलिसांनी प्रतिभा चाकणकर यांची आठ तास चौकशी केल्यानंतर त्यांनी माध्यमांसमोर मोठा दावा केला आहे. त्यांच्या नावावर दाखवण्यात आलेली सर्व खाती बनावट असून, त्या खात्यांशी आपला कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. या प्रकरणामुळे आधीच चर्चेत असलेल्या खरात प्रकरणात आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांची भर पडली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी जोरदार प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. अंधारे यांनी म्हटले की, आम्ही एसआयटीला भेटायला गेलो असताना संपूर्ण परिसर बंद करण्यात आला होता. पत्रकारांनाही प्रवेश नव्हता. मग संशयित असलेल्या चाकणकर भगिनींना अशी विशेष वागणूक का देण्यात आली? असा थेट सवाल त्यांनी केला. या वक्तव्यामुळे तपासाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### बावधनमध्ये 'भीम फेस्टिवल २०२६' उत्साहात संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : विकास प्रतिष्ठान व सुजाता महिला मंडळ, बावधन यांच्या वतीने सिद्धार्थ नगर, बावधन येथे 'भीम फेस्टिवल 2026'चे भव्य आणि दिमाखदार आयोजन करण्यात आले. रिपब्लिकन पक्षाचे युवक राज्य संघटक उमेश कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या निमित्ताने महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक विशाल-साजन यांचा 'आंबेडकरी फोक' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाने उपस्थितांना प्रेरणादायी आणि सांस्कृतिक अनुभव दिला. कार्यक्रमादरम्यान पुणे महानगरपालिकेचे नवनिर्वाचित उपमहापौर परशुराम वाडेकर यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. हा सत्कार शिक्षणमहर्षी मा. राजेंद्र बांदल यांच्या हस्ते संपन्न झाला. तसेच प्रभाग क्रमांक १० मधील विविध नगरसेवकांचाही नागरी सत्कार करण्यात आला. सन्मानित मान्यवरांमध्ये किरण दगडे पाटील, दिलीप (अण्णा) वेडे पाटील, निशा मानवतकर (स्थायी समिती सदस्य), अल्पना गणेश वरपे (महिला व बालकल्याण समिती अध्यक्षा) तसेच रुपाली पवार यांचा समावेश होता. यावेळी बावधन गावच्या माजी सरपंच वैशाली कांबळे, विशाल शेलार, स्वराज कांबळे, मुख्य आयोजक यशराज उमेश कांबळे, सदाभाऊ घुले, धनंजय दगडे पाटील, सूर्यकांत भूडे, दत्ताजी जाधव, रेखाताई सरोदे तसेच दिनकरजी चंदनशिवे यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली. या कार्यक्रमाला बावधन परिसरातील ग्रामस्थ, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला.

### ज्येष्ठ पत्रकार प्रकाश भोईटे यांचे निधन; दिलदार व्यक्तिमत्त्व हरपले



पुणे (आरंभ पर्व) : पुणे श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ पत्रकार प्रकाश ज्ञानेश्वर भोईटे (वय ६५) यांचे आज दुपारी सुमारे तीनच्या सुमारास रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. त्यांच्या निधनाने पत्रकारितेतील एक दिलदार, लढाऊ आणि तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. भोईटे हे कोथळे गावच्या पहिल्या लोकनियुक्त सरपंच जयश्री भोईटे यांचे पती होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, मित्रपरिवार आणि पत्रकारिता क्षेत्रातील मोठा परिवार असा विस्तृत आप्तपरिवार आहे. पत्रकार प्रताप भोईटे, जेजुरी देवस्थानचे माजी विश्वस्त धनंजय भोईटे तसेच कोथळेगावचे विद्यमान ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय भोईटे यांचे ते बंधू होत. प्रकाश भोईटे यांनी पुण्यात पत्रकारिता करताना दैनिक पुढारी आणि दैनिक केसरी या वृत्तपत्रांत काम करून आपली वेगळी ओळख निर्माण केली. स्पष्टवक्तेपणा, समाजाभिमुख दृष्टीकोन आणि लढाऊ बाण्यामुळे ते सहकाऱ्यांमध्ये विशेष लोकप्रिय होते. पुरंदर तालुक्यातील करहे परिसराचा हा सुपुत्र आपल्या दिलदार स्वभावामुळे सर्वांच्या मनात घर करून होता. त्यांच्या अचानक जाण्याने पत्रकारिता क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. "दिलदार मित्र हरपला" अशा शब्दांत अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रकाश भोईटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत असून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशी प्रार्थना व्यक्त केली जात आहे.



### क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील गोपाळवाडी परिसरामध्ये फुले नगर येथे सर्व महापुरुषाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, यावेळी रेड प्लस ब्लड सेंटर व महात्मा फुले चौक, फुलेनगर, गोपाळवाडी यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले यामध्ये 60 रक्तदात्याने रक्तदान करून एक आदर्श निर्माण केला आहे, हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी लखन रंधवे, संकेत होले, ओंकार रंधवे, साजन गिरमे, गोरख बनकर, प्रतिक होले, शिवम होले, प्रसाद होले, ओंकार होले, ऋषी होले, अभी होले, मोहित रंधवे, गणेश रंधवे, सुरज रंधवे यांनी प्रयत्न केला.

### 'रोटाट्रिप्सी'द्वारे गुंतागुंतीची हृदय शस्त्रक्रिया यशस्वी

पुणे (आरंभ पर्व) : मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये हृदयविकार उपचारातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून 'रोटाट्रिप्सी' (Rota Ablation + Lithotripsy) या विशेष प्रक्रियेच्या माध्यमातून ७३ वर्षीय रुग्णावर अत्यंत गुंतागुंतीची अँजिओप्लास्टी यशस्वीपणे करण्यात आली. या यशस्वी उपचारामुळे रुग्णाला नवसंजीवनी मिळाली असून त्यांना समाधानाने घरी डिस्चार्ज देण्यात आला. हनुमंत खंडागळे (वय ७३ वर्षे) हे गेल्या १५ दिवसांपासून चालताना छातीत वेदना आणि श्वास लागणे या तक्रारींनी त्रस्त होते. तपासणीदरम्यान त्यांच्या हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या दोन मुख्य धमन्यांमध्ये ९० टक्क्यांहून अधिक ब्लॉकेज (critical stenosis) आढळले. रुग्णाची स्थिती गंभीर आणि धमन्यांमध्ये कॅल्शियमचे प्रमाण जास्त असल्यामुळे सुरुवातीला कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्टिंग (CABG) करण्याचा सल्ला देण्यात आला होता. मात्र रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी बायपास शस्त्रक्रियेस नकार दिल्याने डॉक्टरांनी 'रोटाट्रिप्सी' या प्रगत तंत्रज्ञानाचा पर्याय निवडला. या प्रक्रियेदरम्यान ब्लॉकेज इतके घट्ट होते की, केवळ 0.014 इंचाचा कोरोनरी वायर आत घातल्यावरही रक्तप्रवाह पूर्णपणे अडथळित झाला आणि रुग्णाला तत्काळ छातीत वेदना जाणवू लागल्या. परिस्थिती अत्यंत नाजूक असतानाही डॉक्टरांच्या टीमने कौशल्यपूर्ण पद्धतीने दोन्ही ब्लॉकेज यशस्वीरित्या दूर केले. उपचारानंतर रुग्णाची प्रकृती स्थिर झाली असून त्यांना "हसतमुखाने आणि नव्या आयुष्याची सुरुवात करत" घरी सोडण्यात आले. या यशस्वी उपचारासाठी कार्डिओलॉजिस्ट डॉ. सुरज पाटील आणि त्यांच्या टीमचे विशेष कौतुक होत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, योग्य निर्णय आणि तज्ज्ञ वैद्यकीय कौशल्य यांच्या साहाय्याने जटिल हृदयविकारांवरही प्रभावी उपचार शक्य असल्याचे या प्रकरणातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# मार्वल लँडमार्कची याचिका फेटाळली

## मुंबई उच्च न्यायालयाचा ग्राहकाला दिलासा : महारेराचा परताव्याचा आदेश कायम; खरेदीदाराला १.३५ कोटी रुपये व्याजासह परत देण्याचे निर्देश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबई उच्च न्यायालयाने घरखरेदीदारांच्या हिताला प्राधान्य देत मार्वल लँडमार्क कंपनीची याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे २०१९ मध्ये महारेरा प्राधिकरणाने दिलेला परताव्याचा आदेश कायम राहिला असून, कंपनीला फ्लॅट खरेदीदार सिद्धार्थ पळेशा यांना १ कोटी ३५ लाख ९९ हजार २४६ रुपये वार्षिक १०.२० टक्के व्याजासह परत करावे लागणार आहेत. या प्रकरणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरासन यांनी दिलेल्या निकालात ८ ऑक्टोबर २०२१ रोजीचा वसुली आदेशदेखील कायम ठेवला आहे. महारेरा प्राधिकरणाने दिलेल्या परताव्याच्या आदेशाला




आव्हान देत मार्वल लँडमार्कने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. कंपनीच्या वतीने निर्णय देणाऱ्या निर्णयाधिकाऱ्यांना परतावा आदेश देण्याचा अधिकार नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला. मात्र, न्यायालयाने हा दावा स्पष्टपणे फेटाळून लावत, अधिकार योग्य पद्धतीने सोपविण्यात आले असतील तर निर्णयाधिकाऱ्यांना परताव्याचा आदेश देण्यास कोणतीही मनाई नसल्याचे नमूद केले. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात असेही स्पष्ट केले की, संबंधित आदेशाविरोधात कायद्यातील निर्धारित मुदतीत अपील दाखल करण्यात आले नव्हते. उलट ही याचिका जवळपास पाच वर्षांच्या विलंबाने दाखल करण्यात आली. भारतीय राज्यघटनेतील कलम २२६ अंतर्गत असलेले विशेष अधिकार दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या प्रकरणांमध्ये सहजपणे वापरता येत नाहीत, असेही न्यायालयाने नमूद केले. याशिवाय, खरेदीदाराने आदेशाच्या अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतल्यानंतरच कंपनीने न्यायालयात धाव घेतल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले. त्यामुळे कंपनीचा उद्देश केवळ अंमलबजावणीला विलंब लावण्याचा असल्याचा अप्रत्यक्ष संदेश या निर्णयातून व्यक्त झाला आहे. या निकालामुळे कायद्याने ठरवून दिलेल्या कालावधीत आव्हान न दिलेले आदेश अंतिम ठरतात आणि अनेक वर्षांनी ते पुन्हा उघडण्याचा प्रयत्न ग्राह्य धरला जाणार नाही, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. घरखरेदीदारांसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असून, महारेराच्या आदेशांना न्यायालयीन पाठबळ मिळाल्याचे यातून स्पष्ट झाले आहे.

## १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'संयुक्त अभिवादन'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समिती, पुणे' यांच्या वतीने मंगळवार, १४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता भव्य 'संयुक्त अभिवादन' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



या कार्यक्रमात राज्य व केंद्र सरकारमधील मंत्री, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर एकत्र येऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणार आहेत. या सोहळ्यास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, डॉ. अमोल कोल्हे, पार्थ पवार, मेधा कुलकर्णी यांच्यासह पुण्यातील सर्व आमदार उपस्थित राहणार आहेत. तसेच पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत फुलकुंडवार, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा हे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित राहणार आहेत. याशिवाय विविध पक्षांचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे (काँग्रेस), धिरज घाटे (भाजप), सुनील टिंगरे (राष्ट्रवादी काँग्रेस), गजानन थरकुडे (शिवसेना उ.बा.ठा.), रवींद्र धंगेकर (शिवसेना) आणि श्रीकांत पाटील (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी) हेही उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजन उपमहापौर परशुराम वाडेकर, अध्यक्ष राहुल डंबाळे, डॉ. सिद्धार्थ धेंडे, नगरसेवक अविनाश साळवे आणि बाळासाहेब जानराव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. पुणे शहर व परिसरातील नागरिकांनी या अभिवादन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून महामानवाला अभिवादन करावे, असे आवाहन जयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## रक्तदान शिबिरात ८८ जणांचे रक्तदान







**पुणे (धायरी) (दै. आरंभ पर्व)**

शिववंदना मित्रपरिवार, न्यू आर्या फाउंडेशन व सक्षम पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ८८ जणांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली.

नकुल कुलकर्णी यांच्या १५०व्या रक्तदानानिमित्त या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नकुल कुलकर्णी यांनी आपले १५०वे रक्तदान पूर्ण करत एक प्रेरणादायी उदाहरण समाजासमोर ठेवले.

या उपक्रमास विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दादा वेधक, शिववंदना मित्रपरिवाराचे प्राज भिलारे, व्यंकटसाई होंडाचे संतोष कदम, सारंग नवले, नगरसेविका सौ. कोमल नवले, विद्याचरण मणेरे, मनोज वाळुंजकर, सचिन नागपुरे, चेतन होशिंग आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

ई. पी. एस कंपनी, गारमाळ, यशवंत विहार समोर, धायरी फाटा येथे आयोजित या शिबिरात विविध क्षेत्रातील नागरिक, युवक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. "रक्तदान हे जीवनदान आहे" या भावनेतून अनेकांनी पुढाकार घेत रक्तदान केले.

यावेळी आयोजकांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांनी नियमित रक्तदान करण्याचे आवाहन केले. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जनकल्याण ब्लड सेंटर, स्वारगेट यांच्या सहकार्याने शिबिरादरम्यान वैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीखाली सुरक्षित पद्धतीने रक्तसंकलन करण्यात आले. रक्तदात्यांची आवश्यक तपासणी करूनच रक्तदान प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. सर्व सहभागी रक्तदात्यांना प्रमाणपत्र व अल्पोपहार देऊन आयोजकांनी त्यांचे आभार मानले.

> **या यशस्वी आयोजनामुळे समाजात सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होत असल्याचे दिसून आले. तसेच व्यंकटसाई होंडा व साई व्यंकट मोटर्स यांनी या कार्यक्रमासाठी मोलाचे योगदान दिले.**

## अतिक्रमण विभागाच्या मनमानीविरोधात मनसे आक्रमक

**जळगाव (दै. आरंभ पर्व)**

शहरातील हॉकर्सच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कंबर कसली आहे. नेहरू चौक येथील पद्मालय विश्रामगृहात आयोजित मनसेची विशेष बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत शहरातील सुमारे ५००० हॉकर्स बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी तीव्र लढा उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्धार करण्यात आला.

महापालिका अतिक्रमण विभागाकडून सध्या सुरू असलेल्या मनमानी आणि दादागिरीवर बैठकीत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. हॉकर्सवर अन्यायकारक कारवाई करून त्यांच्या रोजीरोटीवर गदा आणली जात असल्याच्या तक्रारी बैठकीत मांडण्यात आल्या. फेरीवाला समितीने सुचवलेल्या मार्गदर्शक सूचनांकडे दुर्लक्ष करून प्रशासनाकडून होत असलेली ही 'दडपशाही' यापुढे खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा मनसे पदाधिकाऱ्यांनी दिला.



**५००० हॉकर्ससाठी लवकरच भव्य मोर्चा**

शहरात तातडीने हॉकर्स झोन निश्चित करून व्यवसायाला कायदेशीर स्थैर्य मिळावे. सन्मानाची वागणूक: हॉकर्स बांधवांवर गुन्हेगारासारखी कारवाई न करता त्यांना सन्मानाने वागणूक मिळावी. हॉकर्सना कायदेशीर संरक्षण मिळवून देण्यासाठी लवकरच महापालिका प्रशासनासमोर ठोस कृती आराखडा मांडला जाईल.

प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि हॉकर्सच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी लवकरच शहरात भव्य मोर्चा काढण्याचा निर्णय या बैठकीत एकमताने घेण्यात आला.

या बैठकीस मनसे जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडे, महानगराध्यक्ष विनोद शिंदे, नगरपथविक्रेता समिती सदस्य मोहन तिवारी, विशाल पाटील, दिनेश हिंगणे, तसेच उपमहानगराध्यक्ष ललित शर्मा, चेतन पवार, आशुतोष जाधव, विभाग अध्यक्ष खुशाल ठाकूर, शेतकरी सेनेचे प्रदीप पाटील, शाखाध्यक्ष युसुफ खाटीक यांच्यासह प्रतीक महाजन, लक्ष्मण दांडगे, विनोद पाटील, उमेश तळेले, विवेक महाजन, राजेश मराठे, संजय सोनार आदी हॉकर्स बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. "हॉकर्स बांधवांवर होणारा अन्याय आता सहन केला जाणार नाही. त्यांच्या हक्कांसाठी मनसे रस्त्यावर उतरून लढा देईल," असा स्पष्ट संदेश यावेळी देण्यात आला.

## टॅग्मा इंडियातर्फे २१ ते २४ एप्रिल दरम्यान डाय अँड मोल्ड इंडिया प्रदर्शनाचे आयोजन

**मुंबई/पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील डाय आणि मोल्ड उद्योगासाठीचे सर्वात मोठे 'डाय अँड मोल्ड इंडिया प्रदर्शन २०२६' येत्या २१ ते २४ एप्रिल २०२६ या कालावधीत बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे होणार आहे. टूल अँड गॉज मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन (टॅग्मा) इंडियातर्फे या प्रदर्शनाचे आयोजन केले असून, टूल आणि डाय मेकिंग उद्योगातील ७०० पेक्षा अधिक कंपन्या, या क्षेत्रातील तज्ज्ञ, तंत्रज्ञान पुरवठादार आणि आंतरराष्ट्रीय नवकल्पकांना एकाच छताखाली आणणार आहे, अशी माहिती टॅग्मा इंडियाचे अध्यक्ष देवराया मंजुनाथ शेरेगर यांनी दिली. शेरेगर म्हणाले, "या प्रदर्शनात साधननिर्मिती, साचा निर्मिती, प्लास्टिक इंजेक्शन साचा प्रक्रिया आणि अचूक उत्पादन क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचे दर्शन घडणार आहे. संगणक नियंत्रित यांत्रिक प्रक्रिया, विद्युत डिस्चार्ज यंत्रणा, संगणक सहाय्यित रचना व उत्पादन प्रणाली, त्वरित उत्पादन तंत्रज्ञान, उष्णता प्रक्रिया उपाय आणि प्रगत त्रिमितीय मुद्रण यांसारख्या तंत्रज्ञानाचे व्यापक सादरीकरण येथे होणार आहे. यंत्रसामग्रीपासून साचा यंत्रे, साचा बेस आणि विविध घटकांपर्यंत संपूर्ण अभियांत्रिकी साखळीचा समावेश या प्रदर्शनात असेल." वाहन उद्योग, टिकाऊ वस्तू, विद्युत उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स आणि औद्योगिक उत्पादन अशा विविध क्षेत्रांतील व्यावसायिक या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. ज्ञानविनिमय, संवाद आणि व्यवसायवृद्धीसाठी हे व्यासपीठ महत्त्वाचे ठरणार आहे. जागतिक बाजारपेठेशी जोडणारा दुवा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रदर्शनातून देश-विदेशातील कंपन्यांना सहकार्य आणि तंत्रज्ञान देवाणघेवाणीच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

# यू. एस. पोलो असोसिएशनचा नव्या फ्लॅगशिप स्टोअरसह विस्तार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

यू.एस. पोलो असोसिएशन, भारतातील अग्रगण्य कॅज्युअलवेअर ब्रँड आणि युनायटेड स्टेट्स पोलो असोसिएशनचा (USPA) अधिकृत ब्रँड, महाराष्ट्रातील आपले स्थान अधिक मजबूत करत आहे. शहरातील सर्वात प्रतिष्ठित आणि दीर्घकाळ चालणाऱ्या रिटेल ठिकाणांपैकी एक असलेल्या पुण्यातील जेएम रोडवर ८ एप्रिल २०२६ रोजी आपल्या नव्या फ्लॅगशिप स्टोअरचे भव्य उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी, अभिनेता आणि युवा आयकॉन सनी कौशल विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहून सायंकाळच्या कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. त्यांच्या उपस्थितीने भारतातील तरुण, स्टाईल-सजग ग्राहकांमध्ये ब्रँडचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित झाले. त्यांनी सूत्रसंचालकाच्या नेतृत्वाखालील अनेक मजेदार खेळ आणि प्रेक्षकांशी उत्साही संवाद साधून अतिथींशी संवाद साधला, ज्यामुळे स्टोअरमध्ये एक आकर्षक आणि उत्साही वातावरण निर्माण झाले. त्यांनी रिबन कापून अधिकृत उद्घाटन केले आणि त्यानंतर चाहत्यांशी आपुलकीने संवाद साधला.

ब्रँडशी असलेल्या आपल्या वैयक्तिक संबंधाबद्दल सांगताना सनी कौशल म्हणाले, "मला वाटतं की यू.एस. पोलो असोसिएशन सहज, स्टायलिश आणि अत्यंत सोपे असण्याचं प्रतीक आहे आणि मी सुद्धा तसाच आहे. मी एक अगदी साधा, टी-शर्ट, डेनिम, स्नीकर घालणारा माणूस आहे." दोन मजल्यांवर पसरलेले हे ३,३०० चौरस फुटांचे भव्य स्टोअर, पुण्यात यू.एस. पोलो असोसिएशनच्या पहिल्या नव्या




पिढीच्या रिटेल ओळखीची ओळख करून देते, जे अधिक समकालीन आणि आकर्षक खरेदीचा अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे. या जागेत ब्रँडची अद्ययावत व्हिज्युअल लँग्वेज आणि डिझाइन घटक एकत्रित केले आहेत, जे त्याच्या नवीनतम जागतिक रिटेल वातावरणात दिसतात. हे एक परिष्कृत सौंदर्यशास्त्र दर्शवते जे त्याच्या क्रीडा वारशात रुजलेले राहून त्याच्या उत्क्रांतीचे प्रतिबिंब आहे. जेएम रोडवर मोक्याच्या ठिकाणी असलेले हे स्टोअर, पुरुषांचे कपडे, मुलांचे कपडे आणि पादत्राणे यांमध्ये एक व्यापक संग्रह सादर करते, जे अस्सलपणा आणि खेळावर आधारित सहज शैलीकडे आकर्षित होणाऱ्या ग्राहकांना सेवा देते. स्टोअरमध्ये स्प्रिंग-समर '२६ कलेक्शन प्रामुख्याने सादर करण्यात आले आहे, जे ब्रँडच्या क्रीडा क्षेत्रातील मुळांपासून प्रेरित आधुनिक उन्हाळी पोशाखाचे एक ताजे आणि उन्नत स्वरूप सादर करते. या सीझनमध्ये पोलो शर्ट्सना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे, ज्यात आराम आणि बहुउपयोगितेसाठी डिझाइन केलेले हलके, अधिक सुबक फिट्स, नाविन्यपूर्ण फॅब्रिक्स आणि नवीन टेक्स्चर्स आहेत. हवा खेळती ठेवणारे सीअरसकर्स, प्रीमियम समर फॅब्रिक्स आणि उन्नत फ्लॅट निट्स ही या रेंजची वैशिष्ट्ये आहेत, जे दिवसाच्या कॅज्युअल लूकपासून ते संध्याकाळच्या परिष्कृत लूकपर्यंत सहजपणे वापरता येतील असे कपडे सादर करतात. या कलेक्शनमध्ये आधुनिक जीवनशैलीसाठी तयार केलेले लिनन आणि उन्हाळ्यासाठी आवश्यक कपडे, तसेच बहुपयोगी आणि रोजच्या वापरासाठी डिझाइन केलेले नवीन फिट्स आणि रिफ्रेश्ड वॉशेस असलेली विस्तारित डेनिम श्रेणी देखील सादर केली आहे. हे सर्व घटक मिळून आधुनिक डिझाइन आणि पारंपरिक आरामाचा समतोल साधतात, आणि क्रीडा-प्रेरित फॅशनच्या माध्यमातून क्लासिक अमेरिकन जीवनशैली भारतीय ग्राहकांपर्यंत पोहोचवतात.

सीझन ४ साठी एचएच महाराजा सवाई पद्मनाभ सिंग यांच्यासोबतचा सहयोग कायम ठेवण्यात आला आहे, ज्यामुळे या सीझनच्या कथानकात आणखी भर पडते. पोलो या खेळाशी असलेले त्यांचे घनिष्ठ नाते यूएसपीएच्या (USPA) अस्सल क्रीडा परंपरेला आणि जागतिक विश्वासार्हतेला अधिक बळकटी देते.




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६





# परिवर्तनाचा अखंड विचारप्रवाह म्हणजे बाबासाहेब आंबेडकर

**परिवर्तन हा सृष्टीचा शाश्वत नियम आहे. कोणतीही परिस्थिती, कोणताही काळ कायमस्वरूपी राहत नाही. मात्र, बदल हा एका रात्रीत किंवा एका दिवसात घडत नाही. त्यासाठी विचारांची स्पष्ट दिशा, कृतीची तयारी, नियोजनाची अंमलबजावणी आणि संघर्षाची जिद्द आवश्यक असते. केवळ तक्रार करून परिवर्तन होत नाही; त्यासाठी पर्याय निर्माण करावे लागतात. भारतीय समाजजीवनात हजारो वर्षे जातीय विषमता, असमानता आणि अस्पृश्यतेच्या चिखलात अडकलेल्या वंचित-शोषित समाजाला जगण्याचे समर्थ पर्याय देऊन त्यांना आवाज देणारे महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.**



**लेखिका : स्वाती राहुल चव्हाण**
**(लेखिका भारतीय संविधान अभ्यासक आहेत.)**

**(दै. आरंभ पर्व)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने "मूकनायक" ठरतात. त्यांनी भारतीय समाजाला परिवर्तनाचा अखंड विचारप्रवाह दिला. समाजव्यवस्थेतील विषमता, अस्पृश्यता आणि अन्यायाच्या गडद अंधारात प्रकाश देणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ एका क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी केवळ कायदे घडवले नाहीत, तर विचार, संवाद, संघटन आणि सामाजिक पुनर्रचनेसाठी अनेक पर्याय समाजासमोर ठेवले. "वर्तमानपत्र ते धर्मापर्यंत पर्याय देणारे" असे त्यांचे कार्य व्यापक, बहुआयामी आणि युगप्रवर्तक होते. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, कृषी, जलनीती, कामगार प्रश्न, स्त्रीहक्क, धर्म आणि राजकारण अशा अनेक विषयांचा त्यांनी सखोल अभ्यास केला आणि त्या अभ्यासातून समाजासाठी सक्षम पर्याय दिले. आज देश स्वातंत्र्याचा आणि संविधानाचा अभिमान बाळगत असताना, या महान तत्त्वज्ञाच्या विचारांचा नेमका कोणत्या अंगाने विचार करावा, असा प्रश्न अनेकदा पडतो. मात्र, डॉ. आंबेडकरांना वाचणे, समजून घेणे, उमजून घेणे आणि त्यांचे विचार कृतीत उतरवणे, हाच खरा आंबेडकरवाद आहे. वंचित-शोषितांच्या जगण्याला नवी उभारी देताना बाबासाहेबांनी वर्तमानपत्रापासून संविधानापर्यंत, समता सैनिक दलापासून धम्मपर्यंत, सर्वच क्षेत्रांत नवे पर्याय उभे केले. त्यांनी समाजाला दिलेल्या या समर्थ पर्यायांचा विचार करणे आज अधिक आवश्यक ठरते.

**१. वर्तमानपत्र : विचारप्रसाराचे प्रभावी साधन**

डॉ. आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनासाठी वर्तमानपत्रांचा अत्यंत प्रभावी वापर केला. त्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता यांसारखी वर्तमानपत्रे सुरू करून वंचित समाजाचा आवाज बुलंद केला. त्या काळात दलित, शोषित आणि उपेक्षित समाजाला आपले दुःख, वेदना आणि प्रश्न मांडण्यासाठी कोणतेही व्यासपीठ नव्हते. आंबेडकरांनी हे व्यासपीठ निर्माण केले. वर्तमानपत्रांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवला, शिक्षण, स्वाभिमान आणि संघटन यांचे महत्त्व पटवून दिले आणि समाजाला जागरूक, सजग व विचारशील बनवले. त्यांनी सिद्ध केले की, वर्तमानपत्र हे केवळ बातम्या देणारे माध्यम नसून, ते समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. परखड, अभ्यासपूर्ण आणि तर्कशुद्ध विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचवून त्यांनी लेखणीला सामाजिक संघर्षाचे सामर्थ्य दिले.

**२. शिक्षण : परिवर्तनाची गुरुकिल्ली**

"शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा बाबासाहेबांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. त्यांनी शिक्षणाला परिवर्तनाचे सर्वात सामर्थ्यवान साधन मानले. त्यांच्या मते, शिक्षणामुळे माणूस विचार करायला शिकतो, अज्ञानातून निर्माण होणारी गुलामगिरी संपते आणि आत्मसन्मानाची जाणीव जागृत होते. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नसून, व्यक्तिमत्त्वनिर्मितीसाठी आणि सामाजिक उन्नतीसाठी आवश्यक आहे, असा त्यांचा ठाम दृष्टिकोन होता. स्वतः अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेत त्यांनी कोलंबिया विद्यापीठापासून लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सपर्यंतचा प्रवास केला आणि जगासमोर अद्वितीय आदर्श उभा केला. त्यामुळे शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगतीचे नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचे प्रवेशद्वार आहे, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

**३. कायदा आणि संविधान : समानतेचा भक्कम पाया**

भारतीय समाजव्यवस्था मनुस्मृतीवर आधारलेली असताना, त्या विषम व्यवस्थेला थेट आव्हान देत बाबासाहेबांनी मनुस्मृतीचे दहन केले आणि त्याच आयुष्यात समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता यांवर आधारलेले भारतीय संविधान देशाला दिले. संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांनी सर्व समाजघटकांना समान हक्क बहाल केले. संविधानाच्या माध्यमातून त्यांनी स्त्रिया, दलित, कामगार, दुर्बल आणि वंचित घटकांना न्यायाचा आधार दिला. कायद्यापुढे सर्व समान आहेत, ही संकल्पना त्यांनी राष्ट्रजीवनात रुजवली. लोकशाही, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठा यांचे संरक्षण करणारे संविधान हे त्यांच्या विचारांचे जिवंत रूप आहे. म्हणूनच संविधान हे केवळ शासनपद्धतीचे दस्तऐवज नसून, ते सामाजिक परिवर्तनाचा मार्गदर्शक ग्रंथ आहे.

**४. सामाजिक चळवळी : अन्यायाविरुद्ध थेट लढा**

बाबासाहेबांनी केवळ लेखन, विचार किंवा कायद्यापुरते कार्य मर्यादित ठेवले नाही. त्यांनी प्रत्यक्ष चळवळी उभारून समाजात संघर्षाची ऊर्जा निर्माण केली. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन, अस्पृश्यतेविरुद्धची जनजागृती अशा अनेक चळवळी त्यांनी उभारल्या. या चळवळींनी वंचित समाजात आत्मविश्वास निर्माण केला, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची हिंमत दिली आणि सामाजिक परिवर्तनाची लाट उभी केली.

त्यांच्या नेतृत्वाने दलित समाजाला "दया नव्हे, अधिकार" ही भूमिका शिकवली. अन्यायाविरुद्ध उभे राहणे हीच स्वाभिमानाची पहिली पायरी आहे, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.

**५. धर्म : मानवतेचा नवा मार्ग**

हिंदू धर्मातील जातव्यवस्थेच्या जाचक रचनेविरुद्ध बाबासाहेबांनी पर्याय म्हणून बौद्ध धम्म स्वीकारला. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे अंधश्रद्धा, कर्मकांड किंवा दैववाद नव्हता. धर्म म्हणजे समता, मानवता, करुणा, विवेक आणि नैतिकता होय. म्हणूनच त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून लाखो लोकांना आत्मसन्मान, विचारस्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठेचा नवा मार्ग दाखवला. बुद्ध, धम्म आणि संघ यांच्या आधारावर त्यांनी समाजाला विचारप्रधान, समताधिष्ठित आणि करुणामय जीवनमूल्यांची दिशा दिली. हा धर्मांतराचा निर्णय केवळ धार्मिक नव्हता; तो सामाजिक स्वातंत्र्याचा, मानवी सन्मानाचा आणि नव्या जीवनदृष्टीचा घोष होता. आजही समाजात विषमता, भेदभाव आणि अन्याय विविध स्वरूपांत दिसून येतात. शिक्षणाचा प्रसार झाला असला तरी विचारांचे स्वातंत्र्य आणि सामाजिक समता अजूनही पूर्णत्वास गेलेली नाही. लोकशाही टिकवायची असेल, तर संविधानिक मूल्यांचे आचरण करणे अत्यावश्यक आहे. सामाजिक सलोखा प्रस्थापित करायचा असेल, तर समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा स्वीकार करावा लागेल. डॉ. आंबेडकरांनी दिलेले पर्याय वर्तमानपत्र, शिक्षण, कायदा, संविधान, सामाजिक चळवळ आणि धर्म. हे आजही समाजाला दिशा देणारे दीपस्तंभ आहेत. त्यांच्या विचारांचा केवळ गौरव न करता, त्यांचे आचरण करणे हीच खरी कृतज्ञता आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नव्हते; ते एक अखंड विचारप्रवाह होते. विचार मांडण्यासाठी त्यांनी वर्तमानपत्र दिले, उन्नतीसाठी शिक्षण दिले, न्यायासाठी संविधान दिले आणि आत्मसन्मानासाठी धम्माचा मार्ग दिला. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते की, परिवर्तनासाठी केवळ तक्रार करून चालत नाही; पर्याय निर्माण करावे लागतात, संघर्ष करावा लागतो आणि विचारांना कृतीची जोड द्यावी लागते. म्हणूनच आंबेडकरांचे कार्य आजही प्रेरणादायी, मार्गदर्शक आणि परिवर्तनवादी भारतासाठी अत्यावश्यक ठरते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दिव्यांगांच्या सन्मानासाठी समाजाचा पुढाकार समाधानकारक : पेटकर

**पुणे (आरंभ पर्व) : "दिव्यांग बांधवांच्या सन्मान आणि स्वावलंबनासाठी समाजाकडून होत असलेले प्रयत्न समाधानकारक असून, अशा उपक्रमांमुळे त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडत आहेत. मात्र अजूनही म्हणावा तसा सन्मान दिव्यांगांना आजही मिळत नाही," असे प्रतिपादन पद्मश्री सन्मानित मुरलीकांत पेटकर यांनी केले. दिव्यांग बांधवांना मोटराईज्ड व्हीलचेअरचे योग्य प्रशिक्षण मिळाल्यास त्याचा मोठा फायदा होईल, असेही त्यांनी नमूद केले. समदृष्टि, क्षमताविकास व अनुसंधान मंडळ (सक्षम) पश्चिम महाराष्ट्र प्रांत यांच्या वतीने वानवडी येथील जांभूळकर चौकातील दिव्यांग कल्याणकारी संस्था व संशोधन केंद्र येथे मोटराईज्ड व्हीलचेअर व कॅलिपर वितरण कार्यक्रमात मुरलीकांत पेटकर होते. प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुणे महानगराचे सेवा प्रमुख महेश मानेकर, सक्षमचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. अविनाश वाचासुंदर, अण्णा विसपुते, ऑर्थो-स्पाईन तज्ज्ञ डॉ. विरेंद्र ओस्तवाल, राष्ट्रीय महासचिव उमेश अंधारे, प्रकल्प समन्वयक रविंद्र कोपरगांवकर, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष ॲड. मुरलीधर कचरे, सचिव नरेंद्र बापट आदी उपस्थित होते. सक्षम पश्चिम महाराष्ट्र प्रांत व अल्टीस कंपनीच्या सीएसआर उपक्रमातून अस्थिबाधित दिव्यांगांना निःशुल्क मोटराईज्ड व्हीलचेअर देण्यात आल्या. तसेच दिव्यांग कल्याणकारी संस्था व वल्कन टेक्नॉलॉजी यांच्या सहकार्याने कॅलिपरचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमात एकूण २० मोटराईज्ड व्हीलचेअर आणि २५ कॅलिपरचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविकात नरेंद्र बापट यांनी येत्या काळात ५०० मोटराईज्ड व्हीलचेअर वाटप करण्यात येणार असल्याचे सांगितले. या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांच्या स्वावलंबनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.**

### पुरेसा पाणीसाठा, तरीही काटकसर आवश्यक; जलसंपदा विभागाचे आवाहन

**पुणे (आरंभ पर्व) : 'शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पात चारही धरणांत मिळून १२.५७ अब्ज घनफूट (टीएमसी) एवढा पाणीसाठा आहे. गतवर्षीच्या तुलनेत हा साठा १.१७ टीएमसी अधिक असला, तरी यंदा 'एल-निनो'च्या प्रभावामुळे पाऊस कमी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणी काटकसरीने वापरावे,' असे आवाहन जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे. 'गेल्या वर्षी याच दिवशी (१३ एप्रिल) चारही धरणांत मिळून ११.४० टीएमसी पाणीसाठा होता. यंदा हा पाणीसाठा तुलनेत जास्त असला तरी, पाणी काटकसरीने वापरण्याची आवश्यकता आहे,' असे खडकवासला पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी सांगितले. यंदा पाऊस कमी होण्याची शक्यता असल्यामुळे जलसंपदा विभागाने पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच लगतच्या औद्योगिक क्षेत्रांनी १५ टक्के पाणीकपात करावी, असे पत्र दिले आहे. पाऊस कमी होण्याची शक्यता लक्षात घेऊन जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनीही महापालिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन केले आहे.**

## शुल्कवाढी विरोधात पालकांना दाद मागता येणार!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील खासगी शाळांच्या अवाजवी शुल्क आकारणीला चाप लावण्यासाठी शिक्षण विभागाने विभागीय शुल्क नियामक समित्या कार्यान्वित केल्या आहेत. 'महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११'नुसार राज्य आणि विभागीय शुल्क नियामक समितीचे अध्यक्ष आणि पदसिद्ध सदस्य सचिव यांची नियुक्ती अधिसूचनेद्वारे जाहीर करण्यात आली असून, खासगी शाळांच्या मनमानी आणि अवाजवी शुल्क आकारणीविरोधात आता पालकांना समितीकडे दाद मागता येणार आहे. राज्यात खासगी शाळा, स्वयंअर्थसहायित शाळा मोठ्या संख्येने आहेत. या शाळांच्या शुल्क आकारणीसाठी शुल्क विनियमन कायदा आहे. मात्र, कायद्यातील तरतुदी डावलून अनेक शाळा मनमानी शुल्क आकारणी करत असल्याचे चित्र आहे. पालकांना शुल्कवाढीविरोधात दाद मागता येण्यासाठी कायद्यात विभागीय शुल्क नियामक समिती, पुनरीक्षण समितीचीही तरतूद आहे. मात्र, गेल्या काही काळापासून विभागीय शुल्क नियामक समिती कार्यान्वित नव्हती. त्यामुळे पालकांच्या शुल्काविरोधातील तक्रारी सोडवल्या जात नव्हत्या. या पार्श्वभूमीवर, शालेय शिक्षण विभागाने विभागीय शुल्क नियामक समिती, पुनरीक्षण समिती अधिसूचनेद्वारे नियुक्त केली आहे.

## वाढदिवसानिमित्त रक्तदान करून समाजापुढे आदर्श

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील खेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी स्वतःच्या वाढदिवसानिमित्त स्वतः रक्तदान करून समाजापुढे आदर्श ठेवला. तर त्यांच्या या उपक्रमाने प्रेरीत होऊन इतर पोलीस सहकारी व नागरीकांनीही यावेळी रक्तदान उपक्रमात सहभाग घेतला. या लहानशा ऐनवेळी घेण्यात आलेल्या शिबीरात ५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. खेड पोलीस स्टेशन व चाकण ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजहिताचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला पोलीस कर्मचारी व नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी विमा विकास



**पोलीस निरीक्षक चव्हाण यांचा उपक्रम**

अधिकारी व १२५ वेळा रक्तदान करणारे ॲड. सुनील वाळुंज यांनी रक्तदानाचे महत्व आणि सामाजिक योगदान याविषयी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, तालुक्यातील पोलीस पाटील, हुतात्मा राजगुरू सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर, माजी अध्यक्षा विजयाताई शिंदे, ॲड. मनीषा टाकळकर, नाझनिन शेख, संगीता तनपुरे तसेच पोलीस अधिकारी संतोष घोलप, स्वप्नील कवडे आणि वैभव वाघमारे आदी उपस्थित होते.

चव्हाण यांच्या या कार्यानिमित्त त्यांना राजगुरू सोशल फाउंडेशनच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

## अतिवृष्टीग्रस्तांना भरपाई न मिळाल्याने बेमुदत उपोषण सुरू

**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**

कदमवाकवस्ती येथे सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित नागरिकांना अद्यापही नुकसानभरपाई न मिळाल्याने ग्रामपंचायतीच्या विद्यमान महिला सदस्य तथा माजी उपसरपंच राजश्री उदय काळभोर यांनी नागरिकांसमवेत बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. हे उपोषण १३ एप्रिल २०२६ पासून लोणी काळभोर येथील अप्पर तहसील कार्यालयासमोर सुरू करण्यात आले आहे. सप्टेंबर २०२५ मधील मुसळधार पावसामुळे कदमवाकवस्ती परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी शिरून जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले होते. या




नुकसानाची भरपाई मिळावी यासाठी ग्रामपंचायतीकडून पंचनामे करून ते ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडे वेळेत सादर करण्यात आले होते. मात्र, नंतर जाहीर झालेल्या यादीत अनेक बाधितांची नावे समाविष्ट करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. तसेच, काही पंचनामे ग्राम महसूल अधिकारी कार्यालयाकडून जाणीवपूर्वक वरिष्ठांकडे पाठवले गेले नाहीत, असा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. यामुळे पात्र असूनही अनेक नागरिक आणि शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहिल्याचे सांगण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित ग्राम महसूल अधिकारी व मंडल अधिकारी यांच्या चौकशीची मागणी करण्यात आली असून, दोषींवर निलंबनाची कारवाई करावी, तसेच बाधित नागरिकांना तातडीने नुकसानभरपाई देण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी हे उपोषण सुरू करण्यात आले आहे.

दरम्यान, या उपोषणामुळे प्रशासनावर दबाव वाढला असून, नागरिकांकडूनही मोठा पाठिंबा मिळत आहे. प्रशासनाने लवकरात लवकर निर्णय घेऊन बाधितांना न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात येत आहे.

## शिक्षकांना उन्हाळ्याच्या सुटीत नव्या अभ्यासक्रम अध्यापनाचे धडे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथी या इयत्तांना नवा अभ्यासक्रम लागू करण्यात येणार असून, त्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण ४ मेपासून, म्हणजे ऐन उन्हाळी सुटीत सुरू होणार आहे. हे प्रशिक्षण शिक्षकांसाठी बंधनकारक आहे. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) सहसंचालक डॉ. कमलादेवी आवटे यांनी शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबतच्या सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. नवीन शैक्षणिक वर्ष १५ जून रोजी सुरू होईल. त्यापूर्वी दुसरी, तिसरी, चौथी या इयत्तांना शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. राज्यस्तर, जिल्हास्तर आणि तालुकास्तर अशा तीन टप्प्यांत प्रशिक्षण आयोजित केले जाणार आहे.राज्यस्तरावर ४ ते ७ मे या कालावधीत मराठी आणि उर्दू माध्यमाच्या शिक्षकांसाठी, जिल्हा स्तरावर ११ ते १४ मे या कालावधीत मराठी आणि अन्य माध्यमांसाठी, तर तालुका स्तरावर १८ ते ३० मे या कालावधीत मराठी व अन्य माध्यमांसाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. उर्दू माध्यमासाठी केवळ राज्य आणि जिल्हा अशा दोनच स्तरांवर प्रशिक्षण आयोजित केले जाणार आहे, तर इतर माध्यमांना मराठीसह सामावून घेतले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

## 'बारामती'मध्ये सुनेत्रा अजित पवार यांना शिवसंग्रामचा पाठिंबा : डॉ. ज्योती मेटे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी व अकाली निधनानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली असून, त्यांच्या जाण्याने राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा अजित पवार या उमेदवार असून, शिवसंग्राम पक्षाचा त्यांना पाठिंबा देणार



आहे, अशी घोषणा शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन केली. बारामतीच्या पोटनिवडणुकीत शिवसंग्राम सक्रिय प्रचारात सहभागी होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी सांगितले की, स्वर्गीय अजितदादा पवार आणि स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्यातील ऋणानुबंध हे केवळ राजकीय नव्हते, तर वैचारिक आणि सामाजिक पातळीवरही अतूट होते. त्या नात्याचा मान राखत शिवसंग्रामकडून हा पाठिंबा देण्यात येत आहे. महाराष्ट्राची परंपरा ही सहानुभूती, बांधिलकी आणि सामाजिक ऐक्याची आहे. एखाद्या लोकनेत्याच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची संस्कृती महाराष्ट्राने नेहमीच जपली आहे. याच परंपरेचा आदर राखत, शिव, शाहू, फुले आणि आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांवर चालणाऱ्या अजितदादांच्या कुटुंबीयांना साथ देणे हे संपूर्ण समाजाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी नावाची चर्चा असल्याबाबत विचारल्यावर त्या म्हणाल्या, "प्रशासकीय अधिकारी म्हणून मी अनेक वर्षे काम केले आहे. त्यामुळे ही जबाबदारी सांभाळण्याची क्षमता माझ्यात आहे. भविष्यात संधी मिळाल्यास महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर काम करण्याची इच्छा आहे. त्यासाठी काही राजकीय निर्णय घ्यावा लागला, तर तो त्या परिस्थितीला अनुसरून घेतला जाईल." विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर पक्ष टिकवून ठेवण्यात यश मिळाले असून, पुढील काळात संघटन अधिक मजबूत करण्यावर भर देणार आहे. करुणा मुंडे संविधानाने दिलेल्या अधिकारात निवडणूक लढत असल्या, तरी नैतिकतेच्या आधारे निर्णय घेणे आवश्यक आहे.

## ९५ दिवसांत १४ मजली इमारत;‘पीएमआरडीए’चा विक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) चिखली येथील ‘सेक्टर १२’ गृहनिर्माण प्रकल्पात अवघ्या ९५ दिवसांत १४ मजली इमारत उभारण्याचा विक्रम केला आहे. त्याची ‘आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’ आणि ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’मध्ये नोंद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ‘पीएमआरडीए’ने यापूर्वीचा आपलाच १०० दिवसांचा जुना विक्रम मोडीत काढून बांधकामाचा नवा मापदंड प्रस्थापित केला. या संदर्भात ‘आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’चे परीक्षक अशोक अदाक यांनी अधिकृत प्रमाणपत्र आणि पदक देऊन ‘पीएमआरडीए’चा गौरव केला. प्राधिकरणाच्यावतीने मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी हा बहुमान स्वीकारला. या विक्रमासाठी ‘बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी’ या कंपनीच्या सुमारे ९ हजार कामगारांनी तीन शिफ्टमध्ये अहोरात्र काम केले. अत्याधुनिक ‘प्रीकास्ट आरसीसी’ तंत्रज्ञानामुळे गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता ही इमारत विक्रमी वेळेत पूर्ण झाली. ही वास्तू पूर्णपणे भूकंपप्रतिरोधक असून, शाश्वत नागरी विकासाचे उत्तम उदाहरण ठरली आहे, असे ‘पीएमआरडीए’चे महानगर आयुक्त अभिजीत चौधरी यांनी सांगितले.




# पुण्यात ‘शहर परिवर्तन समिती’ सक्रिय; रस्ते विकासाला वेग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील वाढत्या शहरी समस्यांवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी तसेच विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये समन्वय वाढवण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या ‘शहर परिवर्तन समिती’ची दुसरी बैठक सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकीत रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, वाहतूक आणि स्वच्छता या प्रमुख प्रश्नांवर सविस्तर चर्चा करत ठोस उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले.



बैठकीत शहरातील १२ ‘मिसिंग लिंक’ रस्त्यांच्या विकासाचा आढावा घेण्यात आला. यामध्ये बाणेर–पाषाण लिंक रोड, वाकड ते कस्पटे वस्ती मार्ग, आंबेडकर चौक ते राजाराम ब्रिज रस्ता तसेच वारजे येथील रोजरी स्कूल ते तिरुपती नगर या रस्त्यांवरील भूसंपादन, अतिक्रमण व मोजणीसंबंधी अडचणींवर चर्चा झाली. संबंधित विभागांना कामे वेळेत पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

शहरातील ३२ प्रमुख रस्त्यांच्या विकासासाठी ‘मिशन ३२’ राबविण्याचा निर्णय यावेळी अधोरेखित करण्यात आला. या अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि इतर मूलभूत सुविधा युद्धपातळीवर सुधारण्याचे निर्देश महापालिका आयुक्तांनी दिले. नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील प्रत्येकी एका प्रमुख रस्त्याच्या विकासालाही गती देण्यात येणार आहे.

फुटपाथवरील अडथळे ठरणाऱ्या फीडर पिलरचे सादरीकरण बैठकीत करण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला (MSEDCL) संबंधित डिझाइन मंजूर करून पिलर तातडीने स्थलांतरित करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच रस्त्यांच्या कामांसाठी आवश्यक भूसंपादन प्रस्ताव तात्काळ मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले. नागरिकांच्या तक्रार निवारणासाठी महापालिकेने तयार केलेल्या सहा मोबाईल ॲप्सचा वापर वाढविण्यावर भर देण्यात आला. तसेच पुणे वाहतूक पोलिसांचे ‘PTP’ ॲप या ॲप्सशी जोडल्यास रस्ते व वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम होईल, अशी सूचना करण्यात आली. पावसाळ्यातील पाणी साचण्याच्या (वॉटर लॉगिंग) ठिकाणांची ओळख पटवून त्यावर उपाययोजना करण्यासाठी टेंडर प्रक्रिया पूर्ण करून कामे सुरू करण्याचे आदेश देण्यात आले. वन विभागामुळे अडथळा ठरणाऱ्या प्रकरणांबाबतही संबंधित प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या ३२ रस्त्यांसाठी मनपा आणि पोलीस विभागाकडून प्रत्येकी ३२ समन्वयक अधिकारी नियुक्त करण्यात येणार असून, ते कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवतील. तसेच रिक्षा थांबे निश्चित करणे, बेवारस वाहने हटविणे आणि ‘पे अँड पार्क’ सुविधा सुरू करण्याबाबतही चर्चा झाली. या बैठकीस महापालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर, प्रजित नायर, ओमप्रकाश दिवटे, शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शहरातील मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि वाहतूक कोंडीसह शहरी समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी ‘शहर परिवर्तन समिती’चा हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## ‘पीएमआरडीए’त लवकरच तुकडेबंदी रद्द; चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

‘येत्या काळात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) क्षेत्रात तुकडेबंदी रद्द करण्याच्या कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात लवकरच बैठक घेतली जाईल,’ अशी माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. भामा-आसखेड धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर असलेले शेरेही कमी करण्यासंदर्भात पुनर्वसनमंत्री आणि विभागीय आयुक्तांबरोबर चर्चा करण्यात येणार असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत लोणीकंद येथे समाधान शिबिराचे आयोजन सोमवारी करण्यात आले. त्यावेळी बावनकुळे यांनी ही माहिती दिली. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, हवेलीचे उप विभागीय अधिकारी यशवंत माने, अपर तहसीलदार तृप्ती कोलते-पाटील, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक प्रदीप कंद, जिल्हा परिषदेचे सदस्य किरण साकोरे, हवेली पंचायत समिती सभापती युवराज काकडे या वेळी उपस्थित होते. हवेली तालुक्यातील लोणीकंद गावाला स्वामित्व योजनेत आणून भूमि अभिलेख विभागाच्या वतीने ड्रोन सर्वेक्षण करण्यात यावे आणि मालमत्तापत्रक आणि सनद देण्यासाठी खासगी सर्व्हर तातडीने नियुक्त करावेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वाटप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम सोमवारी सकाळी १०.३० वाजता पुणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पार पडला.



या कार्यक्रमात महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी विरोधी पक्षनेते ॲड. निलेश निकम, शिक्षण समितीचे अध्यक्ष अरुण राजवाडे, व्याख्याते ॲड. क्षितीज गायकवाड, आर.पी.आय. (आ.) पक्षनेत्या हिमानी कांबळे, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाच्या उपायुक्त वसुंधरा बारवे, प्राथमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी सुनंदा वाखारे, माध्यमिक शिक्षणाधिकारी आशा उबाळे, क्रीडा विभाग प्रमुख माणिक देवकर यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, क्रीडाधिकारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर मंजुषा नागपुरे यांनी आपल्या मनोगतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” हा संदेश दिला. समाजातील अन्यायाविरुद्ध विवेक जागृत करून लढा देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, “विद्यार्थी हा रडणारा नव्हे, तर लढणारा आणि समाज घडवणारा असावा,” असे आवाहन त्यांनी केले. स्त्रीचा आदर, समानता आणि राष्ट्रहित जपण्याचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. विरोधी पक्षनेते ॲड. निलेश निकम यांनी डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधान निर्मितीचे ऐतिहासिक कार्य केले असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तके वाचावीत, असे आवाहन केले.

ॲड. क्षितीज गायकवाड यांनी ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर’ या विषयावर व्याख्यान देत त्यांच्या ग्रंथसंपदेबद्दल माहिती दिली. तसेच हिंदू कोड बिल, महिलांना मिळालेले अधिकार आणि एकपत्नी कायदा याबाबत मार्गदर्शन केले.

## अनधिकृत होर्डिंग्जवर हिंजवडीत कारवाई



> ज्या होर्डिंगधारकांकडे परवानगी नाही, त्यांनी तातडीने अर्ज करून प्रक्रिया पूर्ण करावी, अन्यथा येत्या काळात संपूर्ण पीएमआरडीए हद्दीत अशीच कारवाई सुरू राहील.
> - डॉ. अभिजीत चौधरी, महानगर आयुक्त, पीएमआरडीए

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) सोमवारी (१३ एप्रिल) हिंजवडी येथील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करून ते जमीनदोस्त केले. महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी अनधिकृत बांधकामे आणि होर्डिंगवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, अतिक्रमण निर्मूलन विभागाने ही मोहीम तीव्र केली. हिंजवडी (ता. मुळशी) येथील गट क्रमांक २०६ मधील अंदाजे १२५० चौरस फूट क्षेत्रावर उभारण्यात आलेले होर्डिंगचे लोखंडी सांगाडे (फ्रेम) नियमबाह्य असल्याचे पाहणीत आढळले होते. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. संबंधित होर्डिंगसाठी कोणतीही पूर्वपरवानगी घेण्यात आली नव्हती, असे ‘पीएमआरडीए’कडून सांगण्यात आले. दरम्यान, अनधिकृत होर्डिंगप्रकरणी एक महिना ते तीन वर्षांपर्यंत कारावास आणि पाच हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. ‘संबंधितांनी स्वतःहून अनधिकृत होर्डिंग काढून घ्यावीत, अन्यथा प्राधिकरणाकडून होणाऱ्या कारवाईचा खर्च आणि दंड वसूल केला जाईल,’ असा इशारा अतिक्रमण निर्मूलन विभागाचे प्रभारी सहआयुक्त हिंमत खराडे यांनी दिला आहे.

## पुणेकरांच्या पाण्यात कपात, लोकप्रतिनिधी गप्प का?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पुणे शहरावर पाणीकपातीची टांगती तलवार असताना, पुण्याने निवडून दिलेले खासदार, राज्य सरकारमध्ये असलेले शहराचे दोन मंत्री, आमदार, महापालिकेतील विरोधक यांपैकी कुणीच लोकप्रतिनिधी ठोस भूमिका का घेत नाही, असा प्रश्न सामान्य पुणेकरांना पडला आहे. स्थायी समितीच्या अध्यक्षांनी, ‘एक थेंबही पाणी कमी होणार नाही,’ असे आश्वासन देऊनही पाणीपुरवठा विभागाने कपातीच्या दोन प्रस्तावांवर काम सुरू केल्याने संभ्रमात भरच पडली आहे. त्यातच, येत्या गुरुवारी देखभाल-दुरुस्तीसाठी शहरात पाणी बंद ठेवण्यात येणार असल्याने, ही पाणीकपातीचीच सुरुवात आहे का, असाही प्रश्न नागरिक विचारत आहेत.




# संविधानामुळे भारतीय लोकशाहीचा डंका जगात



• लेखक •
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

**(दै. आरंभ पर्व)**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला पाहिजेत. स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ,तत्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील अशा महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महु इथे झाला व संपूर्ण भारतवर्षे सुर्यासारखे लखलखायला लागले.जनुकाय बाबासाहेबांच्या रूपात या पृथ्वीतलावर दैवी शक्तीच प्रगट होवून ज्ञान जोत प्रगटली की काय असे सर्वांनाच वाटत होते. बाबासाहेबांनी समाजाच्या हितासाठी आणि देशहीतासाठी आपले प्राणपनाला लावले. त्यामुळेच त्याच्या अथक प्रयत्नाने संविधानाच्या चौकटीत संपूर्ण भारताला बांधून ठेवले व लोकशाही निर्माण केली.आज प्रत्येकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळत असतो.आजही अनेक देशांमध्ये हुकूमशाही दीसुन येते. परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच भारतीय लोकशाही टीकुन आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांना न्याय मिळावा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले.तेव्हाच भारतात न्यायव्यवस्था प्रस्थापीत झाली. कारण बाबासाहेबांना कल्पणा होती की काही मुठभर समाज देशातील सर्वसामान्यांना कलंकीत करण्याचे काम करीत आहे.परंतु बाबासाहेबांचे या संपूर्ण हालचालींवर लक्ष होते. याकरीता समाजात जातीयवाद, धर्मवाद,पंथवाद यात कटुता निर्माण होवू नये याकरिता सर्वांना एकत्र आणन्याचे काम त्यांनी केले.आज जगामध्ये अनेक देशात बाबासाहेबांच्या विचारांची जोपासना केली जाते.कारण बाबासाहेबांच्या विचारांमध्ये ज्ञाणाचा व बुध्दीमत्तेचा अथांग महासागर आहे.त्याची आपण कल्पना सुध्दा करु शकत नाही. त्याची तुलना समुद्रापेक्षाही अफाट आहे.कारण त्यांच्या बुद्धीमत्तेचा व कौशल्याचा संपूर्ण जगात आजही गुणगान होतांना आपण पहातो.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानयोगी असल्यामुळे त्यांची कला जगात कोणीही अवगत करू शकले नाही.आज भारतात संपूर्ण समाज आनंदाने रहातो व बागडतो ते फक्त बाबासाहेबांच्या विचारांमुळे व संविधानामुळेच. बाबासाहेबाचा जन्म गरीब घराण्यात झाला असला तरी ते मनाने व विचाराने गर्भश्रीमंत होते.आज प्रत्येकाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने प्रेरीत होऊन देश घडवीण्याकरीता पुढाकार घेण्याची गरज आहे.कारण बाबासाहेबांच्या विचाराने भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला मोठी प्रेरणा दिली आहे.त्यामुळे आज जगातील प्रत्येक देशात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर केल्या जातो.परंतु आजचा राजकीय पुढारी बाबासाहेबांचे विचार विसरुन समाजाच्या प्रगतीकडे लक्ष न देता स्वतःची प्रगती करतांना दिसत आहे.याचे दु:ख बाबासाहेबांना अवश्य होत असावे. बाबासाहेब आंबेडकर,ज्योतीबा फुले इत्यादी अनेक थोर महापुरुषांनी व विचारवंत देश सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी अथक प्रयत्न केले व १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु गेल्या काही वर्षांत मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचार करून वाममार्गाने मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती कमवुन देशाच्या १४० कोटी जनतेच्या खांद्यावर महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या,महागडे शिक्षणाचे ओझे लादले आहे.याचे दु:ख बाबासाहेबांना अवश्य होत असेल.स्वत:ला लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी व स्वयंघोषित समाजसेवक समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनो आपण वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावी.असे जर कार्य राजकीय पुढारी करीत असेल बाबासाहेबांना राजकीय पुढाऱ्यांची खरी आदरांजली होईल.कारण बाबासाहेबांनी समाज हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले याला कुठेही तडा जाणार नाही याची जाण आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी ठेवायला पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले सर्वांचेच दैवत आहे.त्यामुळे जयंतीच्या निमित्ताने देशातील प्रत्येक व्यक्तीने, प्रशासनाने व सरकारने वृक्षारोपणाचा संकल्प केला पाहिजे.कारण बदलत्या हवामानामुळे दिवसेंदिवस निसर्गाचा ह्यास होत आहे.त्यामुळे निसर्गाला वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.त्यामुळे १४ एप्रिलला वृक्षारोपण व्हायला हवे यामुळे एकाच दिवशी देशात लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल आणि संपूर्ण निसर्ग प्रफुल्लित होईल व प्रत्येक झाडात, पानात व फुलात आपल्याला बाबासाहेबांचे दर्शन अवश्य होईल.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम! जय हिंद!




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.